पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हँडबॉल

# संगमेश्वर महाविद्यालयाच्या खेळाडूंना रौप्य पदक



मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हँडबॉल स्पर्धेत संगमेश्वराच्या अमोल बळुर्गी, पवन पवार, समर्थ भीमरथी, अनिरुद्ध कोरे, विश्वजित लोहार, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचा संगमेश हिरेमठ या खेळाडूंनी रौप्य पदक पटकावले आहे. या चार विद्यार्थ्यांची  उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हँडबॉल स्पर्धेच्या संघात निवड झाली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे आयोजित राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवात कुमारी तन्वी शिंदे हिने रौप्य पदक तर अरबाज शेख आणि सुफियान पठाण यांनी कास्य पदक मिळवले आहे.

या यशस्वी खेळाडूंचे संगमेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा. धर्मराज काडादी , प्राचार्य सौ. शोभा राजमान्य, जिमखाना चेअरमन प्रा. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. एस. एस. वांगी, प्रा. संतोष खेंडे, प्रा. व्ही. एस. विभुते सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.